RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १९(४)] शुक्रवार, जुलै १८, २०२५/आषाढ २७, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **१८ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक, महाराष्ट्र विधानपरिषद **नियम १११** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. C. BILL No. XII OF 2025.**

A BILL

TO PROVICE FOR RESERVATION IN HOUSING FOR MARATHI PERSONS IN THE STATE OF MAHARASHTRA

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १२.**

**महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी अधिनियम करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढील प्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

(३) तो, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नमूद करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

(ख) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

अधिनियम कोणत्या व्यक्तींना लागू होईल. **३.** महाराष्ट्र राज्यातील नवीन इमारतीमधील ५० टक्के घरे मराठी व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येतील.

विकासाची जबाबदारी. **४.** या अधिनियमान्वये, मराठी व्यक्तींसाठी घरे आरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधित विकासकावर असेल.

विकासक शिक्षेस पात्र. **५.** या अधिनियमान्वये, नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये विकासकाने ५० टक्के घरे मराठी व्यक्तींसाठी आरक्षित ठेवली नाही किंवा मराठी व्यक्तींना देण्यात आली नाहीत, तर विकासक सहा महिन्यांच्या तुरुंगवास किंवा दहा लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

नियम करण्याचा अधिकार. **६.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** पूर्व प्रसिध्दीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा यथास्थिती मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

राज्यात विशेषतः मुंबई शहरातील इमारतीमध्ये मांसाहारी मराठी व्यक्तींना घरे देण्यास नाकारणे, विशिष्ट जाती धर्माच्या लोकांना घरे न देणे, विकासकाकडून मराठी माणसांची अडवणूक करणे असे विविध प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात मुंबईतील विलेपार्ले भागातील मराठी व्यक्तींनी निदर्शने करून शासनाचे लक्ष देखील वेधले आहे. तथापि, यासंदर्भात राज्य शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले आहे. मुंबईतील एका गृहनिर्माण संस्थेत असा प्रकार निदर्शनास आल्यानंतर वृत्तपत्रात याबाबतची माहिती प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित व्यक्तीने माफी मागितली.

मुंबईतील मराठी व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून मुंबई महाराष्ट्राला मिळाली. तथापि, महाराष्ट्रात मराठी व्यक्तींना मुंबईमध्ये घर नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच मराठी व्यक्तींना घरे भाड्याने मिळणे देखील कठीण झाले आहे.

त्यासाठी, राज्यात नव्याने बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीमधील घरांचे बुकिंग सुरु झाल्यानंतर इमारतीत मराठी व्यक्तींसाठी ५० टक्के घरांचे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. यादृष्टीने कायदा करण्याची नितांत आवश्यकता आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १५ जुलै, २०२५.

**ॲड. अनिल परब,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १८ जुलै, २०२५.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद .

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.